**सरतपास शपथेवर सुरु**

**सरतपास अर्जदार तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. ए. बी. बेलेकर यांचे मार्फत सुरु –**

२. साक्षीदारास नि.क्र.१३/१ सोबत दाखल केलेले रेल्वेचे कागदपत्र दाखविणेत आले. सदरचे कागदपत्र हे झेरॉक्स आहे. साक्षीदाराने मुळ कागदपत्र हरविल्याचे सांगितले. सदर कागदपत्रास आर्टीकल 'अ' देणेत येते.

**उलटतपास शपथेवर सुरु**

**उलटतपास वि.प. तर्फे विद्वान वकील श्री.बी. डी. जोशी यांचे तर्फे सुरु:–**

३. मी दिनांक १२ व १३ मार्च, २०२४ रोजी भारतीय रेल्वेने प्रवास केले बाबतचा कागदोपत्री पुरावा रेल्वे खात्याकडून मागणी केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, रेल्वेचे तिकीट संगणकीयकृत मिळते. हे म्हणणे खरे आहे की, रेल्वेने प्रवास करणेपूर्वी अगोदर तिकीट काढावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, तिकीट काढलेनंतर त्याची नोंद रेल्वेच्या संगणकीय प्रणालीमध्ये येते. हे म्हणणे खरे आहे की, मी तिकीट काढले हे दाखविणारा पुरावा माझ्याकडे नाही. मी व माझे वकील मोबाईलचा वापर करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी फोनवरुन वकिलांचेकडून तारखेची माहिती वेळोवेळी घेत असतो. हे म्हणणे खरे नाही की, मी दिनांक १३.३.२०२४ रोजी जाणीवपुर्वक या न्यायालयात हजर राहिलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दिनांक १२ व १३ मार्च २०२४ रोजी रेल्वेने कधीही प्रवास केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर कामी खोटा पुरावा दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्वीकृत्त,

Digitally signed by GANI MANIK NADAF
Date: 2026.01.16 12:24:51 +0530

दिनांक – १३.०१.२०२६

(जी. एम. नदाफ)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इचलकरंजी.